- 7 JUL 2017 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मतदानाचे पैलू उलगडणारे पुस्तक

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : वसंतराव मगदूम यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. ६ : वसंतराव मगदूम यांचे पसंतीनुसार मतदान पद्धती व मतमोजणी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक स्वरुपाचे आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे केले.

वसंतराव मगदूम यांच्या 'पसंतीनुसार मतदान पद्धती व मतमोजणी' पुस्तकाच्या सुधारित तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते संगणक केंद्र सभागृहात झाले.यावेळी ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले उपस्थित होते.

डॉ. शिंदे म्हणाले, "नूतन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायद्याच्या अनुषंगाने प्रकाशित करण्यात येणारी ही तिसरी सुधारित आवृत्ती केवळ विद्यापीठांसाठीच नव्हे, तर पसंतीनुसार मतदान पद्धती वापरल्या जाणाऱ्या सर्वच निवडणुकांसाठी मार्गदर्शक आहे.या मतदान पद्धतीचे विविध पैलू उलगडून दाखविण्याचे काम हे पुस्तक करते. यामध्ये निवडणूक अधिकाऱ्यांसमोर उद्भवणाऱ्या अनेक शंकांचेही निरसन लेखकाने केले आहे. त्यामुळे पसंतीनुसार मतदान पद्धतीच्या संदर्भात एक अतिशय उत्तम पुस्तक आपल्याच एका सहकाऱ्याने लिहीले आहे,याचा अत्यंत अभिमान वाटतो आहे."



कोल्हापूर : वसंतराव मगदूम लिखित 'पसंतीनुसार मतदान पद्धती व मतमोजणी' पुस्तकाच्या सुधारित तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी डॉ. डी. टी. शिर्के, महेश काकडे, वसंतराव मगदूम, अजित चौगुले, सुनील देसाई.

श्री. मगदूम म्हणाले, "विद्यापीठात विविध निवडणुका पसंतीनुसार मतदान पद्धतीने घेण्याचा अनुभव जमेस होता. त्या अनुभवाचा लाभही वेळोवेळी अन्य विद्यापीठे तसेच महाराष्ट्र शासनासही करून दिला. त्याच अनुभवावर आधारित एखादे मार्गदर्शक पुस्तक लिहावे,अशी संकल्पना पुढे आली आणि त्यातून १९८८ ला पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. त्यानंतर १९९५ला दुसरी आवृत्तीही प्रकाशित केली. या दोन्ही आवृत्यांचे राज्यभरातून मोठे स्वागत झाले.. तसेच, त्यांचा लाभही विविध विद्यापीठे व शासनास झाला, ही जमेची बाजू आहे. नूतन विद्यापीठ कायद्याच्या अनुषंगाने होणाऱ्या निवडणुकांसाठीही ही नवीन आवृत्ती उपयुक्त ठरेल." शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष सुनील देसाई यांनी प्रास्ताविक केले. संजय पसारे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 JUl 2011

तरुण भारत

## 'पसंतीनुसार मतदान...' पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर :** वसंतराव मगदूम यांच्या 'पसंतीनुसार मतदान पद्धती व मतमोजणी' या पुस्तकाच्या सुधारित तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या विषयाची पहिली आवृत्ती १९८८ तर दुसरी आवृत्ती १९९५ मध्ये प्रकाशित झाली आहे. या दोन्ही आवृत्यांचे राज्यभरातून स्वागत झाले. शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष सुनील देसाई यांनी प्रास्ताविक केले. संजय पसारे यांनी आभार मानले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 7 JUL 2017

तरुण भारत



कोल्हापूर : जि. प. च्यावतीने दिव्यांगांना विविध साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी बोलताना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे. शेजारी इंद्रजीत देशमुख, अमरिष घाटगे, सर्जेराव पाटील, शौमिका महाडिक, अरूण इंगवले, शुभांगी शिंदे, सुभाष चौगुले.

# जिल्हा परिषदेला सर्वतोपरी सहकार्य करणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

जिल्हा परिषदेने शिक्षण क्षेत्रात अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. खासगी शाळांच्या स्पर्धेत जिल्हा परिषदेच्या शाळा सर्वच पातळीवर सरस ठरत आहेत. अशा शब्दांत कौतुक करत यापुढे शिवाजी विद्यापीठ आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून संयुक्त उपक्रम राबविण्यात येतील यासाठी जिल्हा परिषदेला सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली. जिल्हा परिषदेच्या निधीतून दिव्यांगांना विविध उपयोगी साहित्य वाटप डॉ. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्षा शौमिका महाडिक होत्या.

प्रारंभी शिक्षणाधिकारी सुभाष चौगुले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शिक्षणासाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांचा आढावा घेतला. कार्यक्रमास अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजीत देशमुख, उपाध्यक्ष सर्जेराव पाटील, शिक्षण सभापती अमरिष घाटगे, महिला व बालकल्याण सभापती शुभांगी शिंदे, माध्यमिक शिक्षणाधिकारी टी. एल. मोळे आदी प्रमुख उपस्थित होते.

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची ग्वाही**

7 JUL 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांग विद्यार्थ्यांचा शिक्षा अभियानातूनच विकास : कुलगुरू

## 'सर्व शिक्षा' अंतर्गत अध्ययन सुलभ साधनांचे वितरण

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व उच्च शिक्षा अभियानाच्या एकत्रित संयोगातून विकास साधता येईल, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे बोलताना व्यक्त केले.

जिल्हा परिषदेच्या वतीने मतिमंद, बहुविकलांग, सेरेब्रलपाल्सी, अस्थिव्यंग, कर्णबधिर व अंध विद्यार्थ्यांना सुलभपणे वर्गात बसता येईल, अध्ययन प्रक्रिया सुलभ होईल अशी आवश्यक साधने सर्व शिक्षा अभियान अंतर्गत पुरविण्यात येतात. २०१६-१७ मध्ये प्रवर्गनिहाय दिव्यांग विद्यार्थ्यांची मोजमाप शिबिरामधून अलिम्को तज्ज्ञांमार्फत तपासणी करुन ५६१ दिव्यांग विद्यार्थ्यांना ७३८ साहित्य साधने निश्चित केली आहेत. या साहित्याच्या वितरणाचा शुभारंभ आजपासून करण्यात आला. तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या ५६ विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा



**कोल्हापूर : साहित्याचे वितरण करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शेजारी अरुण इंगवले, सर्जेराव पाटील, शुभांगी शिंदे, शौमिका महाडिक, अंबरिश घाटगे व इंद्रजित देशमुख.**

सत्कार असा संयुक्त कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात डॉ. शिंदे बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी झेडपी अध्यक्षा शौमिका महाडिक होत्या.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, दिव्यांग विद्यार्थ्यांना विकासाच्या समान संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यांना संधी उपलब्ध करून दिल्यास निश्चितपणे ते समाजात स्वतःच्या पायावर उभे राहतील.

प्राथमिक शिक्षणाधिकारी सुभाष चौगुले यांनी स्वागत केले. सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून ४२ लाख रुपये किमतीचे दिव्यांग विद्यार्थ्यांना स्मार्ट केन, डायसी प्लेअर, सीपी चेअर, एम.आर. किट, व्हिलचेअर, श्रवणयंत्र, ब्रेल कीटचे वितरण करण्यात येणार असल्याचे सांगितले.

जिल्हा परिषद अध्यक्ष सौ. महाडिक यांनी, शिक्षण विभागाच्या वतीने राबविण्यांत येत असलेल्या उपक्रमाबाबत व शाळांच्या गुणवत्तेबाबत समाधान व्यक्त केले. शिक्षण सभापती अंबरिश घाटगे यांचेही भाषण झाले. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजित देशमुख यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे कौतुक केले. उपाध्यक्ष सर्जेराव पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती शुभांगी शिंदे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. एल. एस. पाटील, डीआयईसीपीडीचे प्राचार्य डॉ. विलास पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

- 7 JUL 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जि. प.च्या उपक्रमांना विद्यापीठाचे सहकार्य

## देवानंद शिंदे : दिव्यांग मुलांना साहित्य वितरण, शिष्यवृत्तीतील यशवंतांचाही गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विविध उपक्रमांचे उत्तम आयोजन तसेच शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी यांमुळे कोल्हापूर जिल्हा परिषद ही महाराष्ट्रात अव्वल ठरली आहे. त्यामुळेच तिच्या सर्व उपक्रमांना यापुढील काळात शिवाजी विद्यापीठ सर्वतोपरी सहकार्य करील, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने गुरूवारी आयोजित दिव्यांग मुलांना साहित्य वितरण आणि शिष्यवृत्ती परीक्षेतील यशवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शौमिका महाडिक होत्या.

यावेळी विशेष गरजाधिष्ठित असणाऱ्या मतिमंद, बहुविकलांग, सेरेब्रल पाल्सी, अस्थिव्यंग, कर्णबधिर व अंध असलेल्या ५६१ विद्यार्थ्यांना ४२ लाख रुपयांच्या स्मार्ट केन, डायसी प्लेअर, सीपी चेअर, एम. आर. किट, व्हील चेअर, श्रवणयंत्र, ब्रेल किट अशा ७३८ साहित्यसाधनांचे वितरण करण्यात आले. तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत राज्याच्या गुणवत्ता यादीत आलेल्या जिल्ह्यातील ५६ विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.



कोल्हापूर जिल्हा परिषदेत गुरुवारी दिव्यांग विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते साधन-साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेतील भाजपचे गटनेते अरुण इंगवले, उपाध्यक्ष सर्जेराव पाटील, प्राथमिक शिक्षणाधिकारी सुभाष चौगुले, महिला व बालकल्याण सभापती शुभांगी शिंदे, अध्यक्षा शौमिका महाडिक, शिक्षण सभापती अंबरीश घाटगे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. एस. एल. पाटील उपस्थित होते.

यावेळी डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, या दिव्यांग मुलांना निसर्गाने अशाही काही शक्ती दिलेल्या असतात की त्यांच्या आधारे हे विद्यार्थी आपले जीवन घडवू शकतात. मोबाईलच्या माध्यमातून अध्यापन ही काळाची गरज असून, शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून शिक्षकांना याबाबतचे प्रशिक्षण दिले जाईल. शिक्षण सभापती अंबरीश घाटगे म्हणाले, १५ ऑगस्टपर्यंत जिल्ह्यातील उर्वरित ५० टक्के शळा डिजिटल करण्याचा निर्धार आम्ही केला असून, जिल्हा परिषदेचे सर्व पदाधिकारी आणि शिक्षक, अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांतून आम्ही यात यशस्वी होऊ. विविध माहितीपटांच्या माध्यमातून जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थी बहुश्रुत व्हावेत यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

अध्यक्षा शौमिका महाडिक म्हणाल्या, या दिव्यांग मुलामुलींचे आयुष्य सुलभ व्हावे यासाठीच शासनाच्या माध्यमातून सहकार्याची भूमिका घेतली जात आहे, याचे आम्ही एक भाग आहोत याचे आम्हांला समाधान आहे. जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग एक भूमिका घेऊन काम करीत आहे. त्यांच्या पाठीशी राहून आणखी दर्जेदार शिक्षणासाठी प्रयत्न करू.

प्राथमिक शिक्षणाधिकारी सुभाष चौगुले यांनी शिक्षण विभागाच्या कामगिरीचा यावेळी आढावा घेतला. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजित देशमुख यांच्या मार्गदर्शनाने या कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी उपाध्यक्ष सर्जेराव पाटील-कळेकर, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती शुभांगी शिंदे, गटनेते अरुण इंगवले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. एल. एस. पाटील, प्राचार्य डॉ. विलास पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे उपस्थित होते.

- 7 JUL 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांगांना संधी देणे ही समाजाची जबाबदारी

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; जिल्हा परिषदेत दिव्यांगांना साहित्याचे वाटप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दिव्यांगांना निसर्गानेच असामान्यत्व बहाल केलेले असल्यामुळे त्यांचा सन्मान करणे, त्यांना योग्य संधी देणे ही समाजाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. दिव्यांगांना साहित्य सुविधा पुरवण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.



**कोल्हापूर : जिल्हा परिषदेत दिव्यांगांना साहित्य वाटप कार्यक्रमात बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सोबत व्यासपीठावर उजवीकडून इंद्रजित देशमुख, अंबरीश घाटगे, सर्जेराव पाटील, शौमिका महाडिक, अरुण इंगवले, शुभांगी शिंदे, सुभाष चौगुले. (छाया: पप्पू अत्तार)**

जिल्हा परिषदेत दिव्यांग बालकांना मोफत साहित्य वाटपाच्या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी जि. प. अध्यक्षा शौमिका महाडिक होत्या. शिक्षण सभापती अंबरीश घाटगे, शिक्षणाधिकारी सुभाष चौगुले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजित देशमुख उपस्थित होते. यावेळी ५६१ दिव्यांगांना ७३८ प्रकारचे साहित्य वाटप करण्यात आले तर शिष्यवृत्तीत राज्य गुणवत्ता यादीत झळकलेल्या ५६ जणांचा सत्कारही करण्यात आला.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शरीराने अपंग असला तरी मनाने कधीही अपंग होऊ नका, जीवनाचा संघर्ष जिद्दीने लढा. निसर्गाने एक बाजू कमकुवत दिली असलीतरी दुसरी बाजू सशक्त देतो. त्या दुसऱ्या बाजूवर लक्ष केंद्रीत करून दिव्यगत्व विसरून पालक आणि मुलांनी आयुष्याची वाटचाल करा. दिव्यांगांच्या संदर्भात शिवाजी विद्यापीठ व जिल्हा परिषदेने संयुक्त उपक्रम राबवण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

शिक्षण सभापती अंबरीश घाटगे यांनी आपल्या प्रास्ताविकात डिजिटल स्कूलच्या माध्यमातून ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. त्याला सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. डॉक्युमेंटरीच्या माध्यमातून राष्ट्रपुरुषांचा खरा इतिहास पोहोचवण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठाने सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी व्यासपीठावर उपाध्यक्ष सर्जेराव पाटील, महिला बालकल्याण सभापती शुभांगी शिंदे, जिल्हा शल्यचिकीत्सक एल. एस. पाटील. जि.प. सदस्य अरुण इंगवले यांची प्रमुख उपस्थिती होती.

7 JUL 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'दिव्यांगांना संगणक प्रशिक्षण'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठात अंध विद्यार्थ्यांसाठी काम केले जात आहे. त्याची दखल राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली आहे. विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागतर्फे महाविद्यालयीन शिक्षक, विद्यार्थ्यांना संगणकांसंबंधी प्रशिक्षण दिले जाते. डिजिटलयुक्त शाळा उपक्रमाला मदत होण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील शिक्षकांना संगणक प्रशिक्षण देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे सहकार्य राहील, असे आश्वासन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी गुरूवारी दिले.

सर्वशिक्षा अभियानतर्गत समावेशीत शिक्षण उपक्रमांतून दिव्यांग विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्याचा कार्यक्रम जिल्हा परिषदेत आयोजित केला होता. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. जिल्हा परिषद अध्यक्षा शौमिका महाडिक अध्यक्षस्थानी होत्या.

डॉ. शिंदे म्हणाले, 'समाजातील विविध घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विद्यापीठ शक्य तितकी मदत करीत आहे. जिल्हा परिषद शाळा हायटेक होण्यासाठी विद्यापीठ हातभार लावेल. दिव्यांग मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सरकार प्रयत्न करीत आहे. त्यांना मोफत साहित्य दिले जात आहे. केंद्र सरकारने सरकारी कागदपत्रात अपंगाना दिव्यांग असा शब्दप्रयोग करून त्यांना आत्मसन्मान दिले. दिव्यांगात एखादा असामान्य गुण असतो. त्या गुणावर ते विविध क्षेत्रात चांगली कामगिरीत करू शकतात. त्यांच्यातील जगण्यासाठीचा संघर्ष समाजातील विकलांग मानसिकतेच्या लोकांसमोर आदर्शवत आहे. दिव्यांगानी निसर्गाने आपल्यावर अन्याय केल्यची भावना मनात कधीही आणू नये. त्यांनी नेहमी मोठ्या जिद्दीने सकारात्मक, सहनशीलपणे काम करीत राहावे.'



अध्यक्षा महाडिक म्हणाल्या, 'प्राथमिक शिक्षण विभाग ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी विविध उपक्रम राबवत आहे. दिव्यांग मुलांना शिक्षण घेता यावे, यासाठी साहित्य वाटप केले. दिव्यांगांनी जिद्दीने उत्कृष्ट कामगिरी करावी.'

शिक्षण सभापती अंबरीश घाटगे म्हणाले, 'दिव्यांग विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी मोबाइल टीचर कार्यरत आहेत. जिल्ह्यातील सर्व शाळा डिजिटल करण्याचे नियोजन केले आहे. त्यासाठी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी मदत करण्याचे आश्वासन दिले.

विविध प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना मान्यवरांहस्ते साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमास उपाध्यक्ष सर्जेराव पाटील, गटनेते अरुण इंगवले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजित देशमुख, सदस्या शुभांगी शिंदे आदी उपस्थित होते.

7 JUL 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### अजय साळी : विद्यापीठात पाचदिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचा प्रारंभ

# माहिती तंत्रज्ञानानेच 'झिरो पेंडन्सी' शक्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्यानेच प्रशासकीय कारभारात झिरो पेंडन्सीचे उद्दिष्ट साध्य करणे शक्य आहे, असे प्रतिपादन कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी यांनी मंगळवारी (दि. ४) येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा संगणकशास्त्र अधिविभाग आणि गुगल इंडियातर्फे आयोजित पाचदिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे उद्घाटन करताना ते बोलत होते. उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. साळी म्हणाले, प्रशासकीय कारभार गतिमान व पारदर्शी होण्याच्या दृष्टीने माहिती तंत्रज्ञान प्रणाली अत्यंत उपयुक्त ठरत आहे. मोबाईल अप्लिकेशन्स, संकेतस्थळे व ब्लॉगसारख्या माध्यमातून शिक्षण क्षेत्राच्या समस्या सोडविण्यास यश प्राप्त झाले आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणून उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाच्या 'उत्तम सेवा' या संकेतस्थळाकडे पाहता येईल. या संकेतस्थळामुळे विभागाला झिरो पेंडन्सीचे उद्दिष्ट साध्य करता आले. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे (आय.क्यू.ए.सी.) प्रमुख डॉ. आर. के. कामत म्हणाले, तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या सोडविता येणे शक्य आहे. तंत्रज्ञानाचा रचनात्मक व विधायक कार्यासाठी वापराची गरज आहे.

कार्यक्रमास डॉ. यू. आर. पोळ, व्ही. एस. कुंभार, प्रसाद गोयल, परशुराम वडार, आदी उपस्थित होते. यावेळी संगणकशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आर. आर. मुधोळकर यांनी प्रास्ताविक केले. यात त्यांनी 'एंड्रॉइड फंडामेंटल डेव्हलपमेंट' या उपक्रमाची संकल्पना व महत्त्व स्पष्ट केले. कबीर खराडे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रोग्रॅम समन्वयक डॉ. के. एस. ओझा यांनी आभार मानले.

### 'गुगल'तर्फे प्रशिक्षण

या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील व संलग्नित महाविद्यालयांतील ७० प्राध्यापक सहभागी झाले आहेत. त्यांना गुगलतर्फे ललित सिंग, श्रेयांश खन्ना व सिम्मी आनंद प्रशिक्षण देत आहेत.



शिवाजी विद्यापीठात संगणकशास्त्र अधिविभाग आणि गुगल इंडियातर्फे आयोजित फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामच्या उद्घाटनप्रसंगी कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी यांनी मार्गदर्शन केले.